Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०७ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.०६ मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ‘४०० पार’चा कितीही प्रचार केला तरी निकालात वेगळे चित्र दिसणार

## लोकांमध्ये मोदींची दहशत, शरद पवार यांचे निवडणुकीवर भाष्य

**मुंबई (वृत्तसंस्था)–सध्या भाजपकडून ’४०० पार’चा कितीही प्रचार केला जात असला तरी लोकसभा निवडणुकीच्या निकालात वेगळे चित्र पाहायला मिळेल असा मोठा दावा शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे. नुकतेच ’बोल भिडू’ या वेब पोर्टलला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे विधान केले. यावेळी त्यांनी मोदी–वाजपेयींमधला फरक सांगितला,तसेच ’शायनिंग इंडिया’च्या अपयशाचा दाखला देत लोकसभा निवडणुकीच्या निकालाबाबत भाष्य केले आहे.**



यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले, ’’माझी खात्री आहे की, सध्या लोक गप्प आहेत. कारण लोकांमध्ये मोदींची दहशत आहे. त्यामुळे लोक सध्या कोणतीही प्रतिक्रिया देताना दिसत नाहीत. पण लोक मतदानाला जातील तेव्हा प्रतिक्रिया देतील आणि ही प्रतिक्रिया मोदीविरोधी असेल, याबाबत माझ्या मनात शंका नाही’’, असे शरद पवार म्हणाले.याशिवाय ’’भारतात २००४ मध्ये भाजपने ’शायनिंग इंडिया’ मोहीमेतंर्गत लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू केला होता. या निवडणुकीत अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वाखालील भाजप विजय होईल, अशी खात्री अनेकांना होती. मात्र, तेव्हा माझे मत वेगळे होते. अखेर लोकसभा निवडणुकीचा निकाल समोर आला तेव्हा माझे मत खरे ठरले होते’’, असे शरद पवार यांनी सांगितले.पुण्यातील सभेत पंतप्रधान मोदी यांनी शरद पवारांचा उल्लेख अप्रत्यक्षपणे ’भटकती आत्मा’ असा केला होता. याविषयी शरद पवार यांना विचारले असता त्यांनी म्हटले की, ’’मोदींना जे साध्य करायचे आहे, ते साध्य करण्याची स्थिती सध्या नाही. लोकांचा पाठिंबा घसरतो आणि जेव्हा सत्ता आपल्या हातातून जाईल, अशी स्थिती निर्माण होते तेव्हा टोकाची भूमिका घेतली जाते. अशावेळी संबंधित व्यक्तीचं स्वत:वर नियंत्रण राहत नाही. हे नियंत्रण सुटल्यामुळे पंतप्रधानपदाची गरिमा ठेवण्याचे स्मरणही मोदींना होत नाही. त्यामुळे ते वाट्टेल ते बोलतात. त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या विरोधकांविषी बोलतात. हा त्यांचा दृष्टीकोन आहे’’, असे शरद पवार यांनी सांगितले.पुढे पवार म्हणाले, ’’मोदींच्या कामकाजाची एकूण पद्धत पाहता ते जनमानसासमोर आपण केलेले काम मांडण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. मनमोहन सिंग हे पंतप्रधान असताना वर्षातून एकदा प्रसारमाध्यमांशी बोलून आपण काय निर्णय घेतले, याची माहिती देत होते. त्यावेळी त्यांना हवे ते प्रश्न विचारण्याची संधी होती. दहा वर्षे मनमोहन सिंग यांनी पत्रकार परिषद घेण्याची प्रथा पाळली. पण मोदींनी गेल्या १० वर्षांमध्ये एकदाही पत्रकारांना वेळ दिलेला नाही. लोकांशी आणि मीडियाशी सुसंवाद ठेवण्यावर मोदींचा विश्वास नाही’’, असे शरद पवार यांनी सांगितले.

# नागरिकांसाठी गोंडपिपरी पोलिसांची सतर्कता

## महत्वाच्या सूचना पाळण्यासाठी जनतेला आवाहन

**गोंडपिपरी । सूरज माडुरवार**

सद्या सर्वत्र उन्हाळ्याच्या सुट्या असून नागरिक मोठ्या प्रमाणात देवदर्शनासाठी किंव्हा फिरण्यासाठी जातात तर काही मंडळी पाहुण्यांकडे जात असतात.हीच संधी साधत चोरट्यांनी अनेकदा संधी साधत डल्ला मारल्याच्या घटना घडत असतात.या घटना टाळण्यासाठी गोंडपिपरी पोलिसांनी सतर्कता बाळगत नागरिकांना महत्वाच्या सूचना पाळण्यासाठी आव्हाहन केले.




मागील वर्षात गोंडपिपरी तालुक्यात चोरट्यांनी धुळगुस घातला होता.रात्रीच्या सुमारास ट्रॅक्टरच्या ब्याटऱ्या,पाळीव जनावरे कोंबडे,बकरे,शेती उपयोगी वस्तू पिके कापूस,धान चोरीला गेल्याच्या घटना घडल्या.अशा घटना टाळण्यासाठी ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांनी स्वकल्पनेतून एक पाऊल पुढे टाकत सतर्कता बाळगन्यासाठी नागरिकांना आव्हाहन दि.(५)रविवारी लाऊड स्पीकर द्वारे सूचना देत जनजागृती केली.बाहेरगावी जाताना घराला मजबूत कुलूप लावावे,घरामध्ये मौल्यवान वस्तू, दागिने रोख रक्कम न ठेवता सुरक्षित रित्या बँकेत लोकर मध्ये ठेवावी,शक्य असल्यास सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, रात्री झोपताना घराचे दरवाजे उघडे ठेवून झोपू नये, बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना कल्पना देऊन लक्ष ठेवण्यास सांगावे ,कोणी संशयित व्यक्ती किंवा टोळी दिसल्यास पोलिसांना तात्काळ माहिती द्यावी ,लग्न समारंभात जाताना विशेष काळजी घ्यावी दागिने, पैसे पर्स इत्यादीवर लक्ष ठेवावे .एसटी बस मध्ये चढताना उतरताना गर्दीचे ठिकाणी आपल्या पर्स दागिन्यांची विशेष काळजी घ्यावी,पोलीस आपल्या संरक्षणासाठी आहेतच पोलिसांनी दिलेल्या सूचना पाळाव्या असे आव्हाहन ठाणेदार हत्तिगोटे यांच्या मार्गदर्शनात गोंडपिपरी पोलिसांनी केले आहे .

# मीरा कॉलनी येथील स्वच्छता मोहीम ठरली प्रेरणादायक

**पुलगाव । प्रतिनिधी**

परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी एक पाऊल पुढे येऊन मीरा कॉलनी कॉलनी परिसरातील तब्बल पन्नास नागरिकांनी एकत्र येऊन कॉलनीतील मंदिर परिसराची साफसफाई केली.



सुरुवातीला चार–पाच जणांनी मांडलेली संकल्पना साखळी शृंखला जोडल्यासारखे मोठ्या प्रमाणात नागरिक यामध्ये सहभागी झाले. सकाळी सात पासून ते नऊ वाजेपर्यंत खराटे, पावडे, टोपले घेऊन नागरिकांनी पुर्ण परिसर स्वच्छ केला तसेच स्वच्छ केलेला कचरा जाळला. शासकीय संस्था तसेच इतर योजना यांच्या मागे न लागता आपला परिसर सामूहिकरीत्या आपणच स्वच्छ केला तर तो योग्यरीत्या स्वच्छ होतो तसेच परिसरातील नागरिक एकत्र आल्याने सामाजिक बांधिलकी जोपासली जाते व विचाराची देवाणघेवाण होते. स्वच्छ परिसरामुळे रोगराई पसरण्यास मज्जाव होतो व मनही प्रसन्न राहते. प्रत्येक महिन्याच्या एक ते दोन रविवारी हा उपक्रम राबवायचा, असा मानस मीरा कॉलनी वासियांनी केला.ज्या स्वच्छतेला दोन हात लागली, त्या स्वच्छतेला हातांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली तर काय परिणाम दिसतो याचे उत्तम उदाहरण हे मीरा कॉलनीतील मंदिर परिसर ठरले.

स्वच्छतेच्या उपक्रमाविषयी फारसा रस नागरिकात दिसत नाही. त्यासाठी सुरुवातीला थोडे व नंतर जास्त प्रमाणात लोक एकत्र येऊन तो उपक्रम पूर्ण करतात. अशा परिस्थितीत मीरा कॉलनीतील ९० वर्षीय गृहस्थ वसंतराव वंडलकर यांनी स्वच्छता उपक्रमात घेतलेला सहभाग व त्यांची उपस्थिती ही उपस्थितांसाठी प्रेरणा ठरली. वृद्ध जर हजर राहू शकतात तर आपण का नाही? हा विचारही मार्गदर्शक ठरेल.

# भाजपचेच इंजिन बिघडल्यामुळे त्यांना मनसेचे इंजिन सोबत घ्यावे लागले

## शरद पवार–उद्धव ठाकरेंचे इंजिन सुसाट असल्याने ते घाबरले – जयंत पाटील

**सातारा–**शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे इंजिन सुसाट चालले आहे. त्यामुळे विरोधकांच्या मनात धडकी भरली आहे की आपल्या १० ते १५ तरी जागा निवडून येतात का? भाजपचेच इंजिन बिघडल्यामुळे त्यांना मनसेचे इंजिन सोबत घ्यावे लागले, अशी बोचरी टीका जयंत पाटील यांनी सातारा येथे बोलताना केली आहे.



शशिकांत शिंदे हे संसदेत १०० टक्के हजेरी लावतील. मात्र विरोधात उदयनराजे भोसले हे ५ वर्षात फक्त ६ दिवस संसदेत गेले. लोकसभेत आणि राज्यसभेत आपण ज्यांना निवडून देतो ते जर हजर राहत नसतील, तर ते धक्कादायक आहे. पूर्ण वेळ उपलब्ध असणारा नेता, १०० टक्के हजेरी लावून आणि प्रश्न विचारू शकणारा उमेदवार आम्ही दिला असल्याची खोचक टीका जयंत पाटील यांनी केली आहे.

जयंत पाटील म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार हे दुटप्पी भूमिका घेतात अशी टीका सातारा येथे केली होती. त्याला जयंत पाटील यांनी उत्तर देताना सांगितले कि, शरद पवार यांनी कधीही दुटप्पी भूमिका घेतलेली नाही. शाहू महाराजांना उमेदवारी घ्या म्हणून त्यांच्या मागे आम्ही लागलो होतो. तर उदयनराजेंना मात्र दिल्लीला ताटकळत थांबावे लागले होते. उदयनराजे यांना मी सल्ला दिला असता उभे राहू नका. आधी शशिकांत शिंदे यांचे नाव जाहीर झाल्यानंतर उदयनराजे यांचे नाव जाहीर झाले आहे. त्यामुळे दुटप्पीपणा झालेलाच नाही, असे उत्तर जयंत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या टीकेला दिले आहे.जयंत पाटील म्हणाले की, भाजप सरकार शेतकरीविरोधी असून, जीएसटीच्या माध्यमातून जनतेच्या खिशातील पैसा लुटला जात आहे. भाजपने दहा वर्षांपूर्वी दिलेला शेतकऱ्यांना उत्पन्न दुप्पट करण्याचा शब्दही पाळला नाही. उलट शेतकऱ्यांचे कर्ज दुप्पट झाले असून, उत्पन्न निम्मे झाले आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.चपलेपासून टोपीपर्यंत सर्व वस्तूंना १२ ते १८ टक्के जीएसटी वसूल केला जातो. शेततळ्यासाठी प्लास्टिक कागद खरेदीसाठी १८ टक्के जीएसटी द्यावा लागतो. घर चालविण्यासाठी ५० हजार रुपये खर्च केले, तर त्यातील नऊ हजार रुपये हे जीएसटीच्या माध्यमातून पुन्हा केंद्र व राज्य सरकारच्या तिजोरीत जातात, असा हिशेबही जयंत पाटील यांनी दिला. भाजपने मराठी माणसांचे दोन पक्ष फोडले. पक्ष फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे, अशी टीकाही केली.

# धनुष्यबाणाचे बटन दाबून ठाकरेंचा टांगा पलटी करायचाय;मशालही चिलीम होणार–एकनाथ शिंदे

**कोल्हापूर–**धनुष्यबाणाचे बटन दाबून उद्धव ठाकरेंचा टांगा पलटी करायचा आहे. ठाकरेंची मशाल चिलीम होणार आहे असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंना लगावला आहे. कोल्हापूर लोकसभेचे शिवसेनेचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ कागलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंसह काँग्रेस नेते राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.




यावेळी बोलतांना एकनाथ शिंदे म्हणाले, ’’काँग्रेसचे उमेदवार मतदारसंघ सोडून पळत आहेत. २०१४ नंतर एक तरी बॉम्बस्फोट झाला आहे का? देशासाठी २४ तास काम करणारा पंतप्रधान पाहिजे की परदेशात जाऊन गार गार वारा खाणारा पाहिजे? ४ तारखेला या काँग्रेसचा बदला घेणार ना? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला. तसेच तळपत्या सूर्याप्रमाणे महाविकास आघाडी जाळून टाकायची आहे अशी टीका शिंदेंनी केली.पुढे शिंदे म्हणाले, ’’मोदींनी १० वर्षात केलेलं काम आणि ६० वर्षे काँग्रेसने देशाला खड्ड्यात घातलेला काळ पाहा. घरात बसलेल्या व्यक्तीला मत देणार का? फेसबुकवर बोलणाऱ्या व्यक्तीला मतदान करणार? स्वतःच्या स्वार्थासाठी, खुर्चीसाठी काँग्रेसला डोक्यावर घेतले असे म्हणत शिंदेनी उद्धव ठाकरेंना लक्ष केले आहे.पुढे शिंदेंनी विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे. ते म्हणाले, ’’हसन मुश्रीफ, समरजित घाटगे, संजय मंडलिक असा त्रिवेनी संगम इथं झाला आहे. त्यामुळं कोल्हापुरातील महायुतीच्या दोन्ही जागा मोठ्या फरकाने जिंकणार. पहिल्या आणि दुसऱ्या फेजमध्ये महायुतीला प्रतिसाद मिळाला तसाच प्रतिसाद तिसऱ्या फेजमध्ये देखील मिळेल. कडक उन्हाळा असून देखील महायुतीचे सर्व कार्यकर्ते काम करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले काम आणि महायुतीने महाराष्ट्रात केलेले काम याची पोचपावती जनता दिल्याशिवाय राहणार नाही’’, असे शिंदे म्हणाले.

# उद्धव ठाकरेंना जनतेचा अपेक्षित प्रतिसाद नाही:लोक विचारांना स्वीकारायला तयार नसल्याने नैराश्य–मंत्री शंभूराज देसाई

**सातारा–**उद्धव ठाकरे कधी नव्हे एवढे महाराष्ट्रभर फिरत असलेतरी त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. लोक त्यांना, त्यांच्या विचारांना स्वीकारायला तयार नसल्याने उद्धव ठाकरेंमध्ये कमालीचे नैराश्य असल्याची टीका राज्याचे उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई यांनी केली आहे. पत्रकारांशी बोलतांना त्यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे. यावेळी त्यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावरही टीका केली आहे. ते म्हणाले, ’’उद्धव ठाकरे यांच्या



सभांना शिवसैनिक एकत्र होते, तेव्हांचा आणि आताचा मिळणारा प्रतिसाद यामध्ये खूपच फरक आहे. अशातच संजय राऊतांसारखे विश्वज्ञानी काही माणसं त्यांच्यासोबत आहेत. राऊत हे निवडून आलेल्या खासदारांवर टीका करतात. तत्पूर्वी त्यांनी एखाद्या जिल्हा परिषद मतदारसंघातून तरी निवडणूक येऊन दाखववे’’, असा टोला देसाईंनी लगावला.याशिवाय ’’संजय राऊत यांना माध्यमांनी महत्व देण्याचे कारण नाही. पंतप्रधान मोदींनी देशाला उंचशिखरावर नेले आहे. हे देशातील जनतेने स्वीकारलेले आहे. ज्या नेतृत्वाला देशाने डोक्यावर घेतले आहे. आणि उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्या सारखी माणसे दुसऱ्या बाजूला आहेत. त्यांना निवडणुकीच्या मतदानातूनच उत्तर मिळेल’’, असा हल्ला देसाईंनी चढवला आहे.याशिवाय महायुती राज्यात किती जागा जिंकणार याबाबत देसाई यांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, ’’राज्यात पंचेचाळीसहून अधिकच्या जागा जिंकण्याचे ‘महायुती’चे उद्दिष्ट आहे. ते नक्की पूर्ण झालेले दिसेल’’ असा विश्वास शंभूराजेंनी दिला. तसेच वाईचे आमदार मकरंद पाटील हे नाराज नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

### संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर यांच्या शुभहस्ते महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण


# न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये एक मे-महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**सांगोला । प्रतिनिधी**

एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मध्ये एक मे २०२४ रोजी सकाळी आठ वाजून पाच मिनिटांनी सांगोला तालुका शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ सांगोलाचे संस्था सचिव माननीय विठ्ठलराव शिंदे सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीत घेऊन ध्वजास मानवंदना देण्यात आली.

या ध्वजारोहण कार्यक्रमाप्रसंगी संस्था सदस्य प्रा. डॉ. अशोक शिंदे, प्रा. दीपक खटकाळे, प्रा. जयंत जानकर, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला चे प्राचार्य प्रा.नामदेव कोळेकर डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी, न्यू इंग्लिश स्कूल पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री दिनेश शिंदे सर, उपप्राचार्य केशव माने सर , पर्यवेक्षक श्री. संजय शिंगाडे सर, श्री.तानाजी सूर्य गंध सर, श्री.दशरथ जाधव सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ स्मिता इंगोले मॅडम, कार्यक्रम आयोजन समितीचे प्रमुख प्रा.जालिंदर टकले व कार्यक्रम नियोजन समितीचे प्रमुख प्रा चंद्रकांत इंगळे,सांगोला तालुक्यातील डॉक्टर्स, इंजिनियर्स, वकील, प्रतिष्ठित उद्योगपती, ज्येष्ठ नागरिक, व या शिक्षण संकुलातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहण कार्यक्रमानंतर या संकुलातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिकंदर मुलाणी हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे सर होते. आपल्या अध्यक्षीय मनोगत मध्ये बोलताना डॉ. सिकंदर मुलाणी यांनी एक मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन हा साजरा करण्या पाठीमागील उद्देश उपस्थितांसमोर विशद केला व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. यामध्ये इयत्ता नववी मधून सानवी गाडेकर हिने ९७.५०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, प्रगती पाटील हिने ९६.५०% गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला तर आदित्य शिंदे याने ९४.१६% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. इयत्ता अकरावी शास्त्र मधून सानिका पवार हिने ८८.६७% गुण मिळवून प्रथम क्रमांक, श्रेया खटकाळे हिने ८८.१७ टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर साक्षी खांडेकर हिने ८७.६७% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.इयत्ता अकरावी कला शाखेतून सानिका खांडेकर हिने ७७.५०% गुण मिळवत प्रथम क्रमांक, सायली माने हिने ७५.५०% गुण मिळवत द्वितीय क्रमांक तर प्राजक्ता कुंभार हिने ७२.५०% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळाला.इयत्ता अकरावी किमान कौशल्य विभागातून सोनाली पिसे हिने ८७ पॉईंट ३३ गुण मिळवत प्रथम क्रमांक, रविकिरण कुंभार याने ६८.३३% गुण मिळवत द्वितीय क्रमांक तर रियाज मनेरी याने ६१.३३% गुण मिळत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच राज्यस्तरीय विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये निसर्ग फुले, निशा भंडारे,आर्या गोसावी, तृप्ती शिनगारे,आयुष गाडेकर, गौरी जाधव,मयुरी तरकसबंद, विदाद शेख, समर्थ बनकर, श्रीराज भंडारे, तसेच संयोगिता देशमुख हिचे राज्यस्तरीय इन्स्पायर अवॉर्ड साठी निवड तर संचिता देशमुख हिची इन्स्पायर अवॉर्ड साठी निवड झाली. याबद्दल या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या शुभहस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली बेहेरे मॅडम, प्रास्ताविक पर्यवेक्षक श्री तानाजी सूर्यगंध सर यांनी तर आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा मिलिंद पवार यांनी मानले.



## जागतिक कामगार दिनानिमित्त सांगोला नगरपरिषद व इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपरिषद कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य शिबिर संपन्न

**सांगोला । प्रतिनिधी**



दि. १ मे जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून सांगोला नगरपरिषद व इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपरिषद कर्मचाऱ्यांसाठी सांगोला नगरपरिषद कार्यालयात आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नगरपरिषद आरोग्य विभागातील सफाई कर्मचारी यांना त्यांच्या कामाच्या स्वरूपामुळे विविध आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांची दखल घेऊन सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सदर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उदघाटन मुख्याधिकारी डॉ. गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळेस इंडियन मेडिकल असोसिएशन सांगोलाचे अध्यक्षा डॉ. संध्या गावडे, उपाध्यक्षा डॉ. नेहा पाटील, सचिव डॉ. संगीता पिसे, कोषाध्यक्ष डॉ. शीतल येलपले उपस्थित होते. या आरोग्य शिबिरामध्ये बालरोगतज्ज्ञ डॉ. गावडे, डॉ. पिसे, डॉ. केळकर, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. पाटील, डॉ. गावडे, डॉ. केळकर, डॉ. भोसले, डॉ. देवकाते, डॉ. बंडगर, अस्थिरोगतज्ञ डॉ. गवळी, डॉ. लवटे, डॉ. भोसले, नेत्ररोगतज्ञ डॉ. शिंदे, फिजिशियन डॉ. डोंबे, डॉ.गायकवाड, डॉ.नष्टे, डॉ. माळी इ. तज्ञ डॉक्टरांनी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांची आरोग्य तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. यावेळेस मोफत औषधे, रक्त तपासणी व ईसीजी इ. वैद्यकीय सुविधांचा लाभ कर्मचारी यांनी घेतला. कार्यालय अधिक्षक स्वप्नील हाके, आरोग्य निरीक्षक विनोद सर्वगोड, शहर समन्वयक प्रसाद जिरगे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी राजकारणात ३२ वर्षे संघर्ष केला - आमदार शहाजीबापू पाटील

**सांगोला । प्रतिनिधी**

१९९३ पासून पाण्याचा लढा सुरू असून राजकारणातील ३२ वर्षे पाण्यासाठी संघर्ष केला आहे. शेतीला पाणी असेल तर जीवन समृध्द होते. सांगोला तालुक्यात तीव्र दुष्काळ पडल्याने माण नदीत पाणी सोडण्याची मागणी केली होती. खासदारांनी दौरा अर्धवट सोडून फडणवीसांच्या भेटीला गेले आणि थेट कोयना धरणातील पाणी टेंभू योजनेतून माण नदीत सोडले. ऐन उन्हाळ्यात कृष्णा-कोयनेचे पाणी तालुक्याला मिळाल्याने माणसांची, जनावरांची तहान भागली. नीरा उजवा कालव्याच्या पाण्यासाठी मोहिते पाटलांनी कधीही सहकार्य केले नाही. तालुक्याचा दुष्काळ कायमचा हटविण्यासाठी आणि सर्व सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मतदारांनी सहकार्य करावे आणि महायुतीचे उमेदवार खासदार रणजीतसिंह निंबाळकर यांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले

माढा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या प्रचारार्थ आमदार. शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपकआबा साळुंखे- पाटील यांच्या नेतृत्वाखाली सांगोला तालुक्यात गावभेट दौरा संपन्न झाला. पारे, नराळे, मानेगांव, डिकसळ, हणमंतगांव, हंगीरगे, निजामपूर, कडलास, वासुद, वाणीचिंचाळे, लोणविरे या गावात गावभेट दौरा करून मतदारांशी संवाद साधला. यावेळी संग्रामसिंह जाधवराव, भाऊसाहेब रूपनर, दुर्योधन हिप्परकर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी माजी आमदार दीपकआवा साळुंखे पाटील म्हणाले, आम्ही कष्टाने आणलेल्या पाण्याचे श्रेय घेण्याचे विरोधकांचे काम सुरू आहे. आतापर्यंत निवडून आलेल्या खासदारांनी फक्त सभामंडप देवून त्यावरच राजकारण केलं आहे. मात्र खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी तालुक्याचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. सिंचनासाठी पाणी नसल्याने गेली ५० वर्षे लोकांना प्रपंच चालवण्यासाठी ऊसतोडीचे काम करण्यासाठी गाव सोडावे लागले. मात्र, शहाजीबापूंनी आमदार झाल्यानंतर पाण्याचा प्रश्न सोडवला आणि खऱ्या अर्थाने तालुक्यात हरितक्रांतीला सुरुवात झाली. आता आपल्याला हक्काचे पाणी मिळत असल्याने पाणी आणणाऱ्याला खासदार म्हणून निवडून द्यायचे आहे. उजनीच्या दोन टीएमसी पाणी योजनेचे दोनदा भूमिपूजन झाले, मात्र काम सुरू झाले नाही. त्यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि आमदार शहाजीबापू पाटील यांनी सातत्याने प्रयत्न केल्याने सुमारे ९०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. गेल्या ५५ वर्षात जेवढा निधी आला नाही तेवढा निधी गेल्या पाच वर्षात खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि आमदार शहाजीबापू पाटील यांनी सांगोला तालुक्यासाठी आणला असल्याचे माजी आमदार दीपकआबा साळुंखे पाटील यांनी सांगितले.

### उदनवाडी गावातील पहिले इंटरनेट असलेले मुलाणी यांचे घर

## उदनवाडी गाव हायटेक होणार असून इंटरनेट सुविधा घरोघरी पोचणार असून आयटी हब / पार्क साठी विशेष प्रयत्न करणार-शाहरुख मुलाणी

**सांगोला । प्रतिनिधी**

सांगोला येथील उदनवाडी गावातील पहिले इंटरनेट सुविधा असलेले घर हे सुलेमान मुलाणी यांचे ठरले आहे. आता गावात इंटरनेट आल्याने हे गाव हायटेक होणार असून इंटरनेट सुविधा घरोघरी होणार आहे त्यासाठी विधानभवन माकप कार्यालय प्रमुख शाहरुख मुलाणी यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.



यावेळी मुलाणी यांनी उदनवाडी गावात चलभाष व्यतिरिक्त इतर कोणतेही इंटरनेट गावात चालत नव्हते त्याअनुषंगाने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्यासोबत समन्वय साधून एअरटेल व जिओ यांच्या सोबत चलभाष वर बोलून सांगोला येथील संबंधित यंत्रणेद्वारे एअरटेल इंटरनेट व केबल टीव्ही या दोन्हींची सुविधा उदनवाडी गावात वाड्या - वस्तीपर्यंत फायबर वायर इंटरनेट व टीव्ही चॅनल ची सुविधा मिळणार आहे. यावर वलेकर यांनी म्हणाले की, आपले खूप खूप अभिनंदन आणि आभार मुलाणी साहेब. आजच्या काळात इंटरनेटची किती आवश्यकता आहे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही, आपण जे हे कार्य केलेले आहे याच्याबद्दल आपले जितके आभार मानावे तितके कमीच आहेत, धन्यवाद मुलाणी साहेब. आम्हाला इतक्या चांगल्या सुविधांचा लाभ करून देतात त्याबद्दल आपले खूप खूप आभार, असे वलेकर म्हणाले. दरम्यान उक्त इंटरनेट कंपनीचे ठेकेदार स्वराज कॉम्प्युटर अँड इंटरनेट प्रोव्हायडर चे वैभव मिसाळ त्याचे कर्मचारी शिंदे यांनी विशेष कामकाज केले. उदनवाडी ग्रामपंचायत सदस्य समीर मुलाणी आणि अजमीर शेख यांनी देखील विशेष सहकार्य केले.

तर मुलाणी म्हणाले की, इंटरनेट सुविधेसाठी भारत सरकारकडून सुरू असलेल्या कार्याचे कौतुक असून, ग्रामीण भागात ब्रॉडबँडचे जाळे विस्तारणे हे एक आव्हान आहे. डिजिटली सक्षम समाज बनविणे आणि नागरिकांना ज्ञानआधारित अर्थव्यवस्था बनविण्याच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी भारत सरकार 'डिजिटल इंडिया' कार्यक्रमांतर्गत ऑनलाइन सुविधा आणि तळागाळापर्यंत इंटरनेटचे जाळे विस्तारण्यासाठी ठोस काम करीत आहे. इंटरनेट क्षेत्रात '५जी' मुळे मोठी क्रांती घडून येणार असून, टेलिमेडिसिन, शेतीक्षेत्र यांना त्याचा फायदा होणार आहे. इंटरनेटचा दररोजच्या जीवनात कशा पध्दतीने उपयोग होऊ शकेल हे त्यांना पटवून देणार आहे. त्यामुळे गावांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार आणि उत्पन्न वाढणार आहे. टेलीमेडिसिन, ई-मार्केट, बिझनेस टू बिझनेस सर्व्हिसेस शक्य होणार असून ग्रामस्थांचे आयुष्य सुकर होण्यासाठी इंटरनेट सुविधा प्रकल्पाद्वारे अनेक सरकारी सेवा दिल्या जाणार आहेत. ग्रामीण भागात ब्रॉडबँड सेवेचा प्रसार सुलभ करण्यासाठी आणि 'डिजिटल इंडिया' कार्यक्रमातून सामाजिक-आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि परवडणाऱ्या किंमतीत हायस्पीड डिजिटल कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी इंटरनेट सुविधा प्रकल्प सुरू केला आहे. संगणक साक्षर समाज निर्माण करून ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था निर्माण केली जाणार आहे, असे मुलाणी म्हणाले. तसेच, सांगोला तालुक्यातील उदनवाडी गावात आयटी हब / आयटी पार्क करण्यासाठी विविध तज्ञ लोकांबरोबर बैठका व चर्चा सुरू असून लवकरच यावर देखील विचारविनिमय होईल, जर असे घडल्यास तालुक्यातील तरुण तरुणींना तालुक्यातच रोजगार उपलब्ध होईल, असे मुलाणी म्हणाले.

## चैतन्य हास्य क्लब तर्फे हेमंत तेली यांचे अभिशटचिंतन



**सांगोला । प्रतिनिधी**

शहरातील प्रसिद्ध व्यापारी हेमंत तेली यांच्या वाढदिवसानिमित्त चैतन्य हास्य क्लबच्या वतीने अभिशटचिंतन करण्यात आले.ज्येष्ठ साधक मल्लिकर्जुन घोंगडे यांच्या हस्ते तेली यांचा सत्कार करण्यात आला.हेमंत यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत कुटुंब एकसंघ ठेवून व्यवसायात जम बसविला असे सांगून अध्यक्ष जगताप सर यानी शुभेच्छा दिल्या.भागवत पैलवान,मिलिंद पतंगे यांनी मनोगत व्यक्त केले.सदर कार्यक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान,राणौजीबुवा मंदिरात संपन्न झाला.या कार्यक्रमास झिरपे सर ह भ प बाळासाहेब तेली,जयंत तेली,प्रा.राजाभाऊ ठोंबरे,प्रकाश होनराव,अरविंद डोंबे,अशोक जाधव,प्रा

उत्तमराव घाटुळे,उत्तम पाटोळे,सुधीर दौन्डे,सुभाष महिमकर,सुधाकर म्हेत्रे,भाऊसाहेब पवार,वैभव भौरकडे,ढोले आदि उपस्थित होते.

# सांगोला इनरव्हील क्लबच्या अनोख्या प्रोजेक्ट ने विद्यार्थ्यांबरोबर अंगणवाडी शिक्षकांनाही केले तृप्त

**सांगोला । प्रतिनिधी**

दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी भोपळे रोड अंगणवाडी क्रमांक ७ या शाळेचे. रंगरंगोटी ,व बोलक्या भिंतींचे काम पूर्ण करून देण्याचा इनरव्हील क्लब सांगोला ने हाती घेतलेला प्रकल्प आज पूर्णत्वास नेऊन. इनरव्हील अध्यक्षा .सौ .सविता लाटणे. व सहकारी .प्रकल्प अधिकारी . वर्षा पाटील.व सहकारी. तसेच शाळेस मदत करणारे इतरही सहकारी यांचे हस्ते शाळेचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.



वर्गाच्या वाईट अवस्थेमुळे दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची रोडावलेली संख्येची खंत सेविकांना सतत भासत होती. पाच वर्षापासून या कामासाठी त्या इनरव्हील क्लब कडे विनंती करत होत्या .अंगणवाडीची अतिशय तळमळीची गरज सविता ताईंनी मनावर घेतली. व शाळेचे डिजिटल पेंटिंग चे काम त्यांनी सर्व सहकाऱ्यांच्या साथीने पूर्ण केले. हे वर्ष इनरव्हील क्लबचे शताब्दी वर्ष असल्यामुळे. यावर्षीच्या शताब्दी महोत्सवा मुळे १०० प्रोजेक्टचे टारगेट पूर्ण करता करता बऱ्याच ठिकाणी मदत करत सांगोल्याच्या पंचक्रोशीत इनरव्हील क्लब पोहोचला होता . तरीही सर्व सदस्यांना कळकळीचे आवाहन करून, जास्तीत जास्त रक्कम उभी करून, एका आठवड्यात हे ही काम पूर्ण करण्याचा क्लब ने प्रयत्न केला. यामध्ये अंगणवाडी पालकांचाही खारीचा वाटा आहेच .या शैक्षणिक कामासाठी शारदा जाधव, प्रतिमा माळी, कळसे बाई, लता माळी, स्नेहा कुमठेकर, सुरेखा सपाटे, रूपाली बुरांडे, स्वाती ठोंबरे, अं जना बनकर,सुशीला नांगरे, मंगल लाटणे. इत्यादी क्लब सदस्यांनी आपले योगदान क्लबला दिले .सावित्रीबाईच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. क्लब सदस्य व अंगणवाडी सेविका, पालक या दात्यांच्या सत्कारानंतर ,क्लब अध्यक्ष व प्रकल्पाधिकारी वर्षा पाटील त्यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी इनरव्ही क्लबच्या माधुरी गुरमीळे वंदना महिमकर विजया खरतडे अंजली बनकर शाळेतील मॅडम सेविका असे क्लबचे बरेचसे सदस्य उपस्थित होते शेवटी संगीता पाखरे यांनी या कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले. व अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.अशा या उत्कृष्ट प्रोजेक्ट ने शतकावरही बेस्ट चौकार मारून जागतिक इनरव्हील क्लब बुक मध्ये ,सांगोला इनरव्हील क्लब ने आपली नोंद केली.

# संदिपान भुमरे की चंद्रकांत खैरे? थेट विजयाचा आकडा सांगितला

## संभाजीनगरसाठी अब्दुल सत्तारांची मोठी भविष्यवाणी!

**छत्रपती संभाजीनगर | वृत्तसंस्था**

येथे संपूर्ण जिल्ह्यात सध्या लोकसभा निवडणुकीची धूम आहे. गावागात सध्या चालू असलेल्या राजकारणाविषयी चर्चा होत आहे. महायुतीने येथून मंत्री तथा संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांना तिकीट दिले आहे. तर दुसरीकडे आज चंद्रकांत खैरे यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे येथून कोण जिंकणार असे विचारले जात आहे. दरम्यान, संभाजीनगरच्या याच लढतीवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते तथा मंत्री अब्दुल सत्तार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. या मतदारसंघातूनक संदिपान भुमरे हे लाखो मतांच्या फरकाने निवडून येतील, असा विश्वास सत्तार यांनी व्यक्त केला.

अब्दुल सत्तार आज महायुतीचे उमेदवार बाबुराव कदम यांचा प्रचार करण्यासाठी हिंगोलीत गेले होते. यावेळी त्यांनी हिंगोलीतील लढतीवर प्रतिक्रिया दिली. माझं ऑपरेशन झालेलं होतं, म्हणून मी काही दिवस आराम केला. मी आजच घराबाहेर निघालो. आज एवढ्या तापत्या उन्हात लोक हजारोंच्या संख्येने सभेला उपस्थित राहिले. मी महिलांचेही धन्यवाद मानतो. मला खात्री आहे की या सर्कलमधून बाबुराव कदम यांना हजारो मतांची लीड मिळेल, असे सत्तार म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी छत्रपती संभाजीनगरच्या लढतीवरही प्रतिक्रिया दिली. येथून संदिपान भुमरे यांचाच विजय होणार, असं सत्तार म्हणाले. संदिपान भुमरे हे संभाजीनगरमधील लोकप्रिय नेते आहेत. ते संभाजीनगरचे पालकमंत्री आहेत. भुमरे संभाजीनगरमधून लाखोंच्या मतांनी निवडून येतील, यात कुठलीही शंका नाही. कारण संभाजीनगर हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. म्हणूनच भुमरे येथून जिंकतील, असा विश्वास सत्तार यांनी व्यक्त केला. कारण चंद्रकांत खैरे, संदिपान भुमरे यांच्यासह येथून एमआयएमचे नेते तथा विद्यमान खासदार इम्तियाज जलील हेदेखील तेथून निवडणूक लढवणार आहेत. विशेष म्हणजे मराठा आरक्षणासाठी न्यायालयीन लढा देणारे विनोद पाटील हेदेखील येथून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यामुळे भुमरे, खैरे यांना मतफुटीचा धोका निर्माण झाला आहे. यावरच सत्तार यांनी मत व्यक्त केले. विनोद पाटील चांगले नेते आहेत. ते चळवळीत काम करतात. ते मराठा समाजाचे सेवक आहेत. त्यांचे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चांगले संबंध आहेत. त्यामुळे भुमरे यांच्या उमेदवारीला ते विरोध करतील, असं मला वाटत नाही. भुमरे यांच्या उमेदवारीचं त्यांनी स्वागतच केलंय, असं सत्तार म्हणाले.



# मतदान केंद्रावरील 'पाळणाघरे' दि.१२ ला सज्ज ठेवा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

मतदान केंद्रांवर मतदानासाठी येणाऱ्या मातांची बालके सांभाळण्यासाठी मतदान केंद्रांवर पाळणाघरांची सुविधा उपलब्ध करावयाची आहे. ही जबाबदारी आरोग्य विभाग व महिला व बालकल्याण विभाग यांनी संयुक्तपणे पार पाडावयाची असून ही पाळणाघरे मतदानाच्या आदल्यादिवशी म्हणजे दि.१२ रोजी सज्ज असायला हवी, यादृष्टीने नियोजन करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व संबंधित यंत्रणांना दिले.

मतदान केंद्रांवर द्यावयाच्या सुविधांबाबत आज जिल्हाधिकारी स्वामी यांनी आज तालुकास्तरीय यंत्रणांसमवेत दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा घेतला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा महिला बालविकास अधिकारी सुवर्णा जाधव तसेच अन्य विभागप्रमुख तसेच तालुकास्तरीय अधिकारी सहभागी झाले होते.मतदान केंद्रांवर उपलब्ध करावयाच्या पाळणाघरांमध्ये बालकांसाठी आहाराची सोय, पाणी, खेळणी यांच्या उपलब्धतेसह अंगणवाडी सेविका, सहाय्यक इ. यांनी उपस्थिती आवश्यक आहे. ही सगळी तयारी मतदानाच्या आदल्या दिवशी म्हणजे दि.१२ रोजी सायंकाळपर्यंत पूर्ण झाली पाहिजे. त्याचा आढावा तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी घेऊन तसा अहवाल जिल्हास्तरावर द्यावयाचा आहे,असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. प्रत्येक पाळणाघरावर बालकांना द्यावयाचे पाणी तसेच अन्य आहार विषयक सुविधा उपलब्ध ठेवण्याविषयीही सुचना देण्यात आल्या. पाळणा घरातील तसेच मतदान केंद्रावरील अन्य सुविधांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी आपले स्वतःचे मतदानही करावयाचे आहे. त्यादृष्टीने त्यांना एक अन्य सहकारी ही बदलीसाठी उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करण्यात आल्याचे संबंधितांनी सांगितले.



# पांढऱ्या आणि केशरी कार्ड धारकांनाही आयुष्यमान भारत योजनेचा लाभ-डॉ.शेटे

**माजलगाव | प्रतिनिधी**

सुधारित योजनेनुसार पिवळ्या रेशन कार्ड सोबत पांढऱ्या व केशरी कार्ड धारकांना पण आयुष्यमान भारत कार्ड योजनेचा लाभ होणार असून सर्वांनी आपले कार्ड काढून घ्यावे असे आवाहन डॉ ओमप्रकाश शेटे यांनी आयुष्यमान भारत दिन साजरा करताना यशवंत हॉस्पिटल येथे केले. यावेळी व्यासपीठावर डॉ यशवंत राजेंभोसले, डॉ संदीप राणे, उमेश मोगरेकर उपस्थित होते. ओमप्रकाश शेटे म्हणाले आयुष्मान भारत हा माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांची महत्त्वाकांशी योजना आहे. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत दर्जेदार व उत्तम आरोग्य सुविधा पोहोचविणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. महाराष्ट्रातील १००० रुग्णालय या योजनेमध्ये समाविष्ट आहेत. विविध १३५६ हजारावर या योजनेमधून मोफत उपचार मिळतात. आयुष्मान भारत मध्ये महाराष्ट्र अग्रेसर व्हावा व राज्यातील लोकांना जास्तीत



जास्त लाभ मिळावा यासाठी पीएमओ ने डॉ. ओमप्रकाश शेटे यांना खास महाराष्ट्रासाठी पाठवले आहे, आयुष्मान भारत मध्ये केंद्र आणि राज्याचा समन्वय यातून राखला जाणार आहे. यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात २ नोव्हेंबर २०२३ रोजी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र नावाची समिती गठित झाली आहे. रुग्णांना थेट समितीची संपर्क करता यावा व सहजपणे त्यांना विचार मिळावेत यासाठी टोल फ्री क्रमांक व त्याच्या १०० लाईन्स बसवण्यात आले आहेत. लवकरच या टोल फ्री क्रमांक योजनेचे लोकार्पण नामदार देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. आयुष्मान भारत कार्ड चा उपयोग लोकांना हॉस्पिटलमध्ये एटीएम कार्ड प्रमाणे व्हावा अशी इच्छा डॉ ओमप्रकाश शेटे यांनी व्यक्त केली. राणे हॉस्पिटलला सर्व सुविधा मोफत यावेळी बोलताना डॉ. संदीप राणे यांनी राणे हॉस्पिटल मुबंई येथे आतापर्यंत हजार बायपास, ३ हजार एंजिओपलास्टी झाल्याचे सांगितले शिवाय मोफत उपचारासोबत ३० दिवसापर्यंत मोफत राहण्याची व ५रुपयात जेवणाची सुविधा असल्याचे सांगितले यशवंत हॉस्पिटल येथे २० हृदयरुग्णाची तपासणी व ६ अंजीओग्राफी या दिवशी करण्यात आल्या.

# वडवणी ता.सकल धनगर समाजाचा पंकजाताई यांना पाठिंबा

## पंकजाताईंना निवडुन आणण्यासाठी वडवणी येथील धनगर समाज एकवटला

**वडवणी | प्रतिनिधी**

बीड लोकसभा भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना अठरा पगड जाती धर्मातील लोकांचा पाठिंबा मिळत असुन वडवणी तालुक्यातील सकल धनगर समाजानी सुध्दा पंकजाताई मुंडे यांना पाठिंबा दिला आहे पंकजाताई मुंडे यांना निवडुन आणण्यासाठी सकल धनगर समाज एकवटला आहे. जिल्ह्यात अल्पसंख्याकांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणारे नेतृत्व असुन स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांचा वारसा सक्षमपणे चालवण्याचे काम पंकजाताई मुंडे करत आहेत म्हणून त्यांना दिल्लीच्या तख्तावर बसविण्यासाठी वडवणी तालुक्यातील सकल धनगर समाजाने वज्रमूठ आवळली आहे.

दि.३मे २०२४शुक्रवार रोजी धनगर समाजाचे नेते माधव तात्या निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी तालुक्यातील धनगर समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक श्री विठ्ठल बिरुदेव मंदिर येथे संपन्न झाली व या बैठकीत सर्वानुमते पंकजाताईंना निवडून आणण्यासाठी समाजाने निर्धार केला व पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांना समाजाचे भरघोस मतदान देऊन निवडून आणुन लोकसभेत पाठवणार असा निर्णय सर्व समाज बांधवांनी घेतला.



या बैठकीला धारुर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा समाज भूषण माधवतात्या निर्मळ, नगरपरिषदेचे उपाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस प्रदीप नेहकर, वडवणीचे माजी नगरसेवक सतीष बप्पा बडे यांच्या सह या बैठकीला रंगनाथ गंगाराम देशमुख मा.सरपंच पिंपळटक्का,दगडु कानाडे ग्रामपंचायत सदस्य कवडगाव, बद्रीनाथ व्हरकटे मा. सरपंच ढोरवाडी, परशुराम मिसाळ मा.सरपंच परडीमाटेगाव, जगन्नाथ थोरात मा.उपसरपंच ढोरवाडी, ॲड .सुनील डोंबाळे,ॲड.खंडू काळे,भागवत गिरे, धनगर समाजाचे युवा नेते शहाजी लोकरे, निवृत्ती भले ग्रामपंचायत सदस्य, नवनाथ करे ग्रामपंचायत सदस्य, अनिल नांदुरकर ग्रामपंचायत सदस्य, महादेव तरटे, ज्ञानेश्वर मुसळे,रासपाचे तालुकाध्यक्ष बालाजी काळे, नवनाथ तुरे, संतोष पडुळे, नारायण मिसाळ, दीपक मिसाळ, सुंदर चादर, अविनाश मुसळे, सतिश चिलगर, राम मुसळे, सुखदेव गोरे, बाळू गिरे,सतीष सोनवने,गणेश गिरे, राजेभाऊ गिरे, दत्ता शेजाळ ,राधाकिसन गीरे, उद्धव राऊत, राहुल लोकरे, कृष्णा वाघमारे यासह वडवणी तालुक्यातील सकल धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# कौसडी जवळ कार पलटी होऊन एक जखमी



**कौसडी | प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील कौसडी गावा जवळ कार पलटी होऊन एक जण जखमी झाल्याची घटना दिनांक ४ मे शनिवार रोजी सकाळी ७:०० वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

अनंत बाबुराव गिरी वय ५९ वर्ष रा.सावरखेडा ता.जि.हिंगोली कार अपघातात जखमी झाले आहे. अनंत बाबुराव गिरी हे एम एच १५ डी सी २००० या क्रमांकाच्या कार मधून सावरखेडा येथून कुपटा (ता.सेलू ) येथील नातेवाईकाकडे जात होते. बोरी कौसडी रस्त्यावर असलेल्या बसवेश्वर नगर जवळ वळण रस्त्यावर खडी पडल्याने कार पलटी होऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या नाल्यात जाऊन पडली. रस्त्यावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी व स्थानिक ग्रामस्थांनी अनंत गिरी यांना ऑटो मधून बोरी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. गिरी यांच्या कुपटा येथील नातेवाईकांना संपर्क साधून बोलून घेतले डॉक्टरांनी प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी परभणी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. आनंद गिरी यांचा परभणी येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. कार पलटी झाल्याने कारचा समोरील भाग चकणातून झाला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कौसडी बोरी रस्त्याचे डांबरीकरण नुकतेच झाल्याने या रस्त्यावरून वाहने भरधाव वेगाने चालवण्यात येत आहे. यामुळे अपघात घडत आहे. अपघाताची माहिती बोरी पोलिसांना मिळतात बीट जमादार सिद्धार्थ कोकाटे यांनी जखमी झालेल्या आनंद गिरी यांची खाजगी रुग्णालयात भेट घेतली.

# निवेदा मंजूर होऊन ही मूख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील कोल्हा कोथळा रस्त्याचे कामे रखडले

**मानवत | प्रतिनिधी**

मानवत येथील भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा, महाराष्ट्र राज्य चिटणीस प्रा. अनंत वाबुराव गोलाईत (गहिलोत)दिनांक- ०३/०५/२०२४. यांना, मा. कार्यकारी अभियंता, झ.च.ऋड. योजना मुख्यमत्री ग्राम सडक योजना टप्पा दोन अंतर्गत कोल्हा-कोथाळा रस्ता कामा संदर्भात मुग्रायो-२०२२/पीके.१७२/डॅम-४ दि. १२/१२/२०२२. उपरोक्त संदर्भीय विषयी आपणास विनंती करण्यात येते की, मुख्यमुत्री ग्राम सडक योजना टप्पा दोन अंतर्गत दि. १२/१२/ २०२२ रोजी महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाने मानवत तालुक्यातील एकुण १४ कामांची यादी शासन परिपत्रका सोबत आपल्या कार्यालयास पाठविली आपल्या कार्यालयाने



सदर यादीतील कोल्हा- कोथाळा, राजुरा या रस्ते कामाची जिल्हा नियोजन परभणी येथील बैठकीत मंजुरी घेउन सलग ८ ते ९ वेळा निविदा प्रकाशित करण्यात आली. त्यानंतर आपल्या कार्यालया मार्फत असे समजले की, अल्फिया कन्स्ट्रक्शन परळी यांना या कामाची निविदा मंजुर करण्यात आली. डिसेंबर २०२२ पासून ते आज पर्यंत १६ महिन्यांचा कालावधी उलटुन गेला असून या रस्त्याच्या कामाची प्रगती शुन्य आहे. सदर रस्त्याच्या कामाची निविदा भरण्यास कंत्राटदार उत्सुक नसल्याचे कारण इस्टिमेट कमी दराचे व कमी रक्कमेचे आहे असे समजले. सदर रस्त्याच्या कामासंदर्भात महाराष्ट्र शासनाकडून वाढीव बजेट साठी आपल्या कार्यालया कडून काही प्रयत्न करण्यात आले आहे का, नसेल तर आम्हाला कळवावे, आम्ही आमच्या स्तरावर प्रयत्न करू कारण संबंधित रस्त्यावरील नागरिकांना रहदारीसाठी मरण यातना भोगाव्या लागत आहे. तसेच मंजुर झालेल्या १४ कामांपैकी इतर कोण कोणत्या रस्त्याची कामे प्रगती पथावर आहेत हे लेखी कळवावे. तरी सदर कोल्हा- कोथाळा रस्ता लवकरात लवकर तयार करून नागरिकांच्या सोईसाठी उपलब्ध करावा अशी मागणी अनंत गोलाईत प्रदेश चिटणीस भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र राज्य यांनी प्रशासनाकडे केली आहे.



## आ.सुरेश धस यांचे उत्स्फूर्त स्वागत करून गावो गावी प्रचार सभेला प्रतिसाद

# एकाच दिवसात २५ गावात आ.सुरेश धस यांच्या प्रचार दौऱ्याचा झंजावात

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारार्थ आमदार सुरेश धस हे सध्या आष्टी मतदारसंघात गाव,वाडी,वस्ती,तांडा इथपर्यंत मतदारांशी संवाद साधताना दिसत आहेत.याचाच एक भाग म्हणून शनिवारी पत्रकारांनी देखील आमदार सुरेश धस यांच्या दौऱ्यामध्ये सहभागी होत त्यांच्या दिनचर्याचा अनुभव घेतला.यामध्ये आमदार सुरेश धस हे गावातील प्रत्येक मतदारांशी संवाद साधताना पहावयास मिळत होते,तसेच सकाळी आठ वाजल्यापासून सुरू झालेला हा दौरा रात्री दहा वाजेपर्यंत अविरतपणे सुरू असल्याचे चित्र दिसून आले. यामध्ये गावो गावी आमदार सुरेश धस यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना पहावयास मिळत होता.





या वेळी आ.सुरेश धस यांच्या गावोगावी झालेल्या कॉर्नर बैठकीतून त्यांनी उपस्थित तरुणांना सरकारने दिलेल्या १० टक्के आरक्षण आणि त्याचा जी आर आपण वाचला पाहिजे असे आवाहन केले.जेणेकरून यातून आपल्याला किती फायदा होतो आहे हे लक्षात येईल.शिवाय विरोधक विनाकारण भाजपा सत्तेवर आले की घटना बदलणार अशी आरोही ठोकत आहेत.मात्र कुणी ही संविधान बदलू शकत नाही हे खात्रीने सांगू इच्छितो.असे म्हणत धस यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन करत विनंती केली.

दिवसभर शनिवारी साकत, लोणी (खुंटेफळ वा.), पिंपळा (काकडवाडी), सुंबेवाडी, ठोंबळसांगवी, हातोळण, पारोडी, खरडगव्हाण, सोलापूरवाडी, खुंटेफळ, वाहिरा,पिंपळगाव दाणी, मेहकरी, सराटेवडगाव,टाकळी (आ), शेरी खु.,शेरी बु(खाकाळवाडी), मांडवा,बेलगाव,बीडसांगवी (गणगेवाडी/कणसेवाडी), देसुर,चिंचाळा या गावांना गाव दौरा करत प्रचार केला.

पुढे बोलताना धस म्हणाले की,देशामध्ये पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करण्यासाठी आपल्याला बीड लोकसभेच्या खासदारपदी विकासाभिमुख नेतृत्व असलेल्या पंकजा मुंडे यांना विराजमान करायचे आहे. विरोधकांच्या अफवांना बळी न पडता आणि त्यांच्या अफवांवर विश्वास न ठेवता ज्या पंकजा ताईनी पालकमंत्री असताना भरघोस निधी आपल्या मतदार संघाला उपलब्ध करून दिला,विविध योजना आपल्या मतदारसंघात राबविल्या गेल्या त्यामुळे अनेक विकास कामे या माध्यमातून राबविली गेली.अशा व्यक्तीला आपण मतदान केले पाहिजे.असे सांगत लोकशाहीत विनंती करून मतदान मागण्यासाठी आज आपल्याकडे आलो असल्याचे ही शेवटी धस म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचे गटाचे नेते हनुमंत जंजिरे,माजी उपसभापती गोपाळ भाऊ रक्ताटे,माजी सरपंच रिंकू बेलेकर,सरपंच संदिप खाकाळ, बाळासाहेब वाघुले,सरपंच विकास अमृते, माजी सरपंच संदीप चौधरी, माजी उपसरपंच उद्धव ससाणे, युवा नेते संभाजी शेंडगे, सरपंच सुभाष माळी,देवा धुमाळ, अशोक मुटकुळे, संतोष मुटकुळे, सीताराम वीर, रावसाहेब मुटकूळे,झुंबर श्रीखंडे,भाजपा नेते कल्याण पोकळे, माजी सरपंच बन्सीभाऊ पोकळे, माजी पंचायत समिती सदस्य किरण पोकळे,उधोजक प्रविण वारे,सरपंच तात्यासाहेब शिंदे,माजी उपसरपंच संजय पोकळे,अमृत पोकळे,सरपंच नंदकिशोर करांडे, उपसरपंच सदाशिव गणगे,घनशाम नरोडे, माजी सरपंच जालिंदर बाप्पू नरोडे,माजी सरपंच बबन करांडे, संपत ढोबळे,प्रशांत घुमरे, रामभाऊ गणगे,बाबासाहेब पानतावणे, बाबासाहेब शिंदे, संदीप करांडे, सुभाष गणगे आदींसह सर्व गावा सर्व प्रचारादरम्यान गाव भेटीतील प्रमुख कार्यकर्ते पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## सुव्यवस्था कायम:कायदा, सुव्यवस्थेसाठी आष्टीसह कडा, आंधळेवाडी गावात पोलिसांचा रुट मार्च

**आष्टी । प्रतिनिधी**

देशात लागू असलेली आचारसंहिता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठीआष्टी शहरात किनारा चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक, कमानवेश,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,बसस्थानक, म.फुले चौक,महावीर चौक, असा पथसंचलन करण्यात आले तर कडा येथे डॉ.आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, कृषि उत्पन्न बाजार समिती, मेन बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बाजार स्थळ संग्राम चौक बसस्थानक असा रुटमार्च काढला तर अति संवेदनशील भाग म्हणून ओळख असणाऱ्या तालुक्यातील आंधळेवाडीत पोलिसांकडून पथसंचलन करण्यात आले आहे. नागरीकांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे, निवडणूक काळात आदर्श आचारसंहितेचे पालन करावे असे



आवाहन पोलिस निरिक्षक संतोष खेतमाळस यांनी केले. आष्टी तालुक्यात लोकसभा निवडणुकी निमित राजकीय वातावरण तापलेले असून या निवडणूका निर्विघ्न व शांततेत पार पडव्यात,म्हणून कडा, आंधळेवाडी आष्टी शहरात आष्टी पोलिसांकडून (रुटमार्च) पथसंचलन करण्यात आले. याप्रसंगी पो.नि संतोष खेतमाळस,स.पो.नि विक्रांत हिंगे,स.पो.नि विजय नरवडे, पो.उप.नि कृष्णा शिंदे,अजिनाथ काकडे यांच्यासह केंद्रीय रेल्वे पोलिस अधिकारी,आष्टी पोलिस ठाण्याचे कर्मचारी,दंगल नियंत्रक पथकाचे जवान मोठ्या संख्येने रूट मार्च मध्ये सहभागी झाले होते.

---

## आष्टी येथे होणाऱ्या शरदचंद्रजी पवार यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे–राम भाऊ खाडे

**आष्टी । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ सोमवार दिनांक ६ मे रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे मा शरदचंद्रजी पवार साहेब यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्रजी पवार गट) आष्टी विधानसभा अध्यक्ष राम खाडे यांनी केले आहे.बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी संपूर्ण जिल्हा पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित झाला आहे. खासदार प्रीतम मुंडे यांच्या दहा वर्षाच्या काळात आष्टी मतदार संघात ग्रामीण भागात जनसंपर्क नसल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे.अहमदनगर बीड परळी रेल्वेचे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे रेल्वेचे स्वप्न आज ही अधुरेच राहिले असून सदरील रेल्वे ही अहमदनगर ते अमळनेर पर्यंत कधी येते तर कधी येत नाही.सदरील रेल्वे बीड व परळी पर्यंत कधी धावणार? का निवडणूक आली की रेल्वेचे गाजर दाखविले जाते.केंद्र सरकारच्या आरोग्यासाठी असलेल्या अनेक योजनांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे रुग्णांची हॉस्पिटलमध्ये होणारे लूट होत आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी आहे.केंद्र व राज्य सरकारमध्ये समन्वय नसल्यामुळे सर्वसामान्य जनतेला कोणताही लाभ मिळत नाही. सध्या आष्टीचे तिन्ही आजी माजी आमदार विकासासाठी एकाच बाजूने असले तरी विकासाची गंगा कागदावरच असल्याचे दिसून येते.त्यामुळे आष्टी मतदार संघाचा विकास करण्यासाठी बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब,भूषणसिंह राजे होळकर यांची आष्टी येथे सोमवारी सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार आहे.या सभेस उपस्थित.महेबूब शेख आ.संदीप क्षीरसागर.जीवनराव गोरे.मा.आ सय्यद सलीम.मा आ साहेबराव दरेकर,मा आ उषा दराडे,मा.आ पुर्थ्वीराज साठे,मा आ बदामराव पंडित, मा आ राजेंद्र जगताप,सुशीला मोराळे,बबन गिते, शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा),परमेश्वर सातपुते,अण्णासाहेब चौधरी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख,रवि ढोबळे,मिलींद आव्हाड मानव हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष,ाल इंडीया पँथर दिपक भाई केदार,डेमोक्ट्रीक पार्टी चे प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांगणे,अहमद पठाण ड.किशोर मुळे,सुनील नाथ, अमोल तरटे,आप चे अशोक येडे ऑल इंडिया पँथर जिल्हा अध्यक्ष उपस्थित राहणार आहे.



---

# आ.किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात सुरु झाला अम्मा की आटो जलसेवा उपक्रम

## वाटसरुंची भागणार तहान, अम्माच्या हस्ते उपक्रमाचा शुभारंभ

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरातील वाढती ऊन लक्षात घेता आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून चंद्रपूरात अम्मा की आटो जलसेवा हा उपक्रम सुरु करण्यात आला असून या उपक्रमा अंतर्गत शहरातील आटोंमध्ये पाण्याच्या कॅन उपलब्ध करुन देण्यात आल्या आहे. आज रविवारी गंगुबाई उर्फ अम्मा जोरगेवार यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



यावेळी आमदार किशोर जोरगेवार, सायली येरणे, करणसिंग बैस, विलास सोमलवार, जय मिश्रा, कविता निखारे, रुपा परसराम, सामाजिक कार्यकर्ते विनोद रेब्बावार, आटो चालक मालक राजू एडलावार, विकास रेब्बावार, विठ्ठल कापटे, राजेंना परांडी, बंडु पूरके, नवनीत जिल्लरवार, महेंद्र रामटेके आदीची उपस्थिती होती.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून यंग चांदा ब्रिगेड आणि स्व. प्रभाताई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविल्या जात आहे. महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी विविध प्रकारचे स्वयंरोजगार संबंधित शिबिरे, आरोग्य शिबर, सेतु केंद्र, अम्मा का टिफिन, अम्मा की दुकान असे उपक्रम सदर संस्थेच्या वतीने सुरु आहे.

दरम्यान चंद्रपूरातील वाढती ऊन लक्षात घेता आता आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून स्व. प्रभाताई चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शहरात अम्मा कि आटो जलसेवा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उप्रकमा अंतर्गत शहरातील विविध भागातून चालत असलेल्या आटोमध्ये वाटसरूंसाठी पिण्याच्या पाण्याची कॅन उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दररोज ही सेवा सुरु राहणार असून यातुन जलसेवा होणार आहे. ही एक फिरती पाणपोई असून यातून वाटसरुंची तहान भागवली जाणार आहे. आज रविवारी अम्मा च्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. लाल फित कापून या सर्व आटोंना अम्माने हिरवी झेंडी दाखवली आहे.

---

## बालविकास प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश



**मूल । प्रतिनिधी**

समाज सुधारक शिक्षण प्रसारक मंडळ मूल द्वारा संचालित बालविकास प्राथमिक शाळा मूल येथे, शैक्षणिक सत्र २०२३-२४ मध्ये पार पडलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त करून शाळेचे नाव उंचावले.यामध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत १८ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत.

या यशाचे श्रेय शाळेत घेतले जाणारे अतिरिक्त शिष्यवृत्ती वर्ग,शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता बुटे यांचे मार्गदर्शन,आई -वडील, वर्गशिक्षक विवेक हरमवार यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन यामुळे हे यश संपादन करता आले असे शिष्यवृत्ती पात्र झालेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले. शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या इयत्ता पाचवीतील तपस्या सुखदेवे, नव्या बोबाटे, पावनी लेनगुरे, हितश्री कवाडे, रुणझुण नागोशे, धनश्री आत्राम, पुजा कोरेवार, प्रणिती गोवर्धने, रोहिणी खोब्रागडे, रोहन साठोने, स्वयम चिचघरे, आराध्य म्याकलवार, गणेश बोपेवार, ओम नागापुरे, प्रणव नागोशे, मारकवार, अथर्व तुंगीडवार या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता बुटे यांनी अभिनंदन केले. संस्थेचे सचिव अनिल बुटे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व सर्वांना शुभेच्छा दिल्या.

---

## नागपूरमधून गडकरींचा पराभव निशचित:राज्यातील 'इतक्या' जागा मविआ जिंकणार–विजय वडेट्टीवार

**कोल्हापूर**–महाराष्ट्रात महाविकास आघडीचा किमान ३८ जागांवर विजय होईल, असा विश्वास विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला आहे. तसेच विदर्भतील सर्व जागांवर आमचा विजय निश्चित असून नागपूरमधून नितीन गडकरी विजयी होणार नाही असे ते म्हणाले. कोल्हापूरमध्ये त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला आहे.

देशात सत्तांतर होणार, तानाशाही, जुमलेबाज सरकार जाणार आहे. राज्यात एकतर्फी निवडणूक होताना दिसत आहे. संपूर्ण राज्यातील वातावरण हे महाविकास आघाडीच्या बाजूने झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यात महाविकास आघाडीचे उमेदवार शाहू महाराज यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. शाहू महाराज यांनी निवडणूक लढावी, अशी आमची आणि कोल्हापूरकरांची इच्छा होती. ती



त्यांनी मान्य केली. शाहू महाराज ५ लाख मतांनी निवडून येतील'', असे वडेट्टीवार म्हणाले.याशिवाय त्यांनी भाजपवर जोरदार टीका केली आहे. ''१० वर्षात काय उपलब्धी हे सांगण्याऐवजी काँग्रेसच्या नावाने बोंबा मारत आहेत. भाजपला काँग्रेसची किती भीती आहे, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणात दिसत आहे. देशात २ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. बेरोजगारी वाढली आहे, त्यावर बोलत नाहीत'', असे वडेट्टीवार म्हणाले.याशिवाय ''आरक्षणाची मर्यादा आम्ही ७३% पर्यंत वाढवणार असल्याचे आश्वासन वडेट्टीवार यांनी दिले. जो समाज आरक्षणापासून वंचित आहे, त्यांना न्याय देऊ. लोकसंख्येनुसार आरक्षण वाढवले जाते. मर्यादा वाढवल्याशिवाय समाजांना न्याय मिळणार नाही. कायद्याला धरून आरक्षण दिले जाईल, असे वडेट्टीवार म्हणाले आहेत. तसेच भाजपने घरे फोडली. पक्ष फोडले. आमच्या घराच्या देखील काही खिडक्या घेऊन गेले. नांदेडची खिडकी भाजपने काढून नेली, पण आमचे घर शाबूत आहे. सुशोभीत आहे'', अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

---

## जय पवारांनी अचानक घेतली मनोज जरांगेंची भेट:निवडणुकीच्या तोंडावर आंतरवालीत खलबत

**जालना**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी अचानक मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. यावेळी जय पवार यांच्यासोबत सूरज चव्हाण देखील असल्याची माहिती आहे. एक निवडणुकीच्या तोंडावर जय पवार यांनी जरांगे यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी जय पवार मुंबईतून हेलिकॉप्टरने थेट छत्रपती संभाजीनगरला पोहोचले. तेथून कारने जय पवार हे अंतरवाली सराटी येथे पोहोचले. याठिकाणी जय पवार यांनी अर्धा तास वाट पाहिल्यानंतर मनोज जरांगे यांच्याशी त्यांची भेट झाली. यानंतर आगतस्वागतचा कार्यक्रम पार पडला. जय पवार यांनी ही केवळ सदिच्छा भेट असल्याचे सांगितले.दरम्यान, मनोज जरांगे हे सगेसोयऱ्यांना आरक्षण देण्याच्या मागणीसाठी ठाम आहेत. यासाठी




राज्य सरकार आणि मनोज जरांगे यांच्यात संघर्ष सुरू आहे. आरक्षणाच्या मुद्यावरून जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. त्यानंतर एक निवडणुकीच्या तोंडावर जय पवार यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतल्याने चर्चांना उधाण आले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सह्याद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .